सिएटल येथे जून-जुलै २००७ मध्ये संपन्न झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनानिमित्त तयार करण्यात आलेल्या विशेषांकामध्ये "**महाराष्ट्रातील महामार्गांचा विकास**" या विषयावर श्री. दी. बा. देशपांडे, सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, यांचा लेख.



# महाराष्ट्रातील महामार्गांचा विकास

**दी.बा.देशपांडे**

**प्रस्तावना**

भारत गणराज्यातील महाराष्ट्र हे एक प्रथितयश व अग्रेसर आर्थिक व व्यापारी राज्य आहे. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ सुमारे ३ लक्ष चौ.कि.मी. असून ३५ जिल्ह्यांनी वेढला आहे. महाराष्ट्राला विविध भौगोलिक क्षेत्राचे वरदान लाभले असून त्यामध्ये कोकणच्या सखल भागापासून ते सह्याद्रीच्या डोंगर रांगांपर्यंतचा समावेश आहे. महाराष्ट्रातील जनतेला वाङमयात गोडी असून भूतकाळामध्ये मोठमोठी व्यक्तिमत्त्वे महाराष्ट्राने देशाला दिली आहेत. भारताच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये महाराष्ट्राचा नेहमीच सिंहाचा वाटा राहिलेला आहे. उदाहरणादाखल २००५-०६ मध्ये जेव्हा भारताचा एकूण स्थानिक उत्पादन दर (जी.डी.पी.) ८.४ टक्के होता तेव्हा महाराष्ट्राचा एकूण स्थानिक उत्पादन दर (जी.डी.पी.) ९.३ टक्के होता. महाराष्ट्राची राजधानी मुंबई असून भारताचे आर्थिक केंद्र म्हणून तिला मान्यता प्राप्त झाली आहे. नजिकच्या भविष्यकाळात मुंबई आशियाई क्षेत्राचे आर्थिक केंद्र होण्याची क्षमता बाळगून आहे. पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर इत्यादी झपाट्याने व जलद गतीने वाढणारी इतर महत्त्वाची शहरे महाराष्ट्रात असून भविष्यकाळात महानगर म्हणून मान्यता मिळण्याची क्षमता त्यांच्यात आहे. महाराष्ट्राने सर्व प्रकारचा विकास जसे, माहिती तंत्रज्ञान, जीवतंत्रज्ञान, शेतकीप्राधान्य तंत्रज्ञान, औद्योगिक विकास, शिक्षण इत्यादींचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला आहे व त्याला गती दिली आहे. अशा प्रकारे होणाऱ्या महाराष्ट्राच्या जलद विकासाबरोबर कायदा व सुव्यवस्थेच्याबाबतीत सुद्धा महाराष्ट्र सध्या भारतात अग्रेसर आहे. त्यामुळे इतर राज्यांतील विविध क्षेत्रांतील व्यक्ती महाराष्ट्राकडे आकर्षित होत आहेत.

# महाराष्ट्राचा रस्ते विकासाचा इतिहास

महाराष्ट्राच्या रस्ते विकासाच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास सुमारे १००० वर्षांपूर्वी सुद्धा रस्त्याला महत्त्व दिल्याचे आढळून येते. वेगवेगळ्या राजवटींमध्ये रस्ते विकासाला चालना देण्यात आली आहे आणि रस्त्यांबाबतचे कांही महत्त्वाचे संरचनात्मक बांधकाम झाले आहे. आजही ही बांधकामे विविध प्रकारच्या नैसर्गिक लहरींना तोंड देऊन उत्तम स्थितीत आहेत.




मुंबई-पुण्याला जोडणाऱ्या सर्वपरिचित व चर्चित अशा बोरघाट रस्त्याचे सर्वेक्षण व आखणी तसेच माथेरानवर जाण्यासाठी रस्त्याचा विकास हा आधुनिक युगातील विकास म्हणून लक्षात राहतो. महाराष्ट्रातील विविध राज्यकर्ते रस्ते विकास ही एक सामाजिक बांधिलकी समजून त्याकडे पाहात होते व आजही तशीच विचारधारा आहे. रस्ते विकासासाठी महाराष्ट्राचे असलेले योगदान सर्वमान्य आहे. भारतामध्ये रस्ते विकासासाठी जो (Road Development ) पहिला नकाशा नागपूर येथे तयार करण्यात आला तो **नागपूर प्लॅन १९४३** म्हणून सर्वपरिचित आहे. यानंतर दर २० वर्षांनी सुधारित करण्यात आलेले रस्ते विकासाचे प्लॅन व धोरण नागपूर प्लॅनच्या मूलभूत तत्त्वावर आधारित व सुधारित आहेत.

## **२१ व्या शतकातील रस्ते विकासाची वाटचाल**

या शतकातील विविध क्षेत्रांत झपाट्याने होणारी वाढ व त्यामुळे रस्ते विकासापुढे उपस्थित झालेल्या आव्हानांना महाराष्ट्र राज्य यशस्वीपणे सामोरे गेले आहे. मागील १० वर्षांत महाराष्ट्रातील ग्रामीण रस्ते ते राष्ट्रीय महामार्ग या सर्वांच्या लांबीमध्ये सुमारे ४६००० किमीने वाढ झाली असून आजमितीस रस्त्यांची एकूण लांबी २,३१,४३० किमी. आहे. राष्ट्रीय महामार्गांच्या जाळ्यामध्ये वाढ झाली असून लांबीमध्ये ४८ टक्के वाढ झाली आहे.




रस्त्यांच्या पृष्ठभागामध्ये सुद्धा या शतकात मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्यात आली असून भूपृष्ठ रस्त्यांमध्ये ५१००० किमी वाढ झाली आहे. आजमितीस सुमारे २ लक्ष किमी लांबीची वाहतूक गुणवत्ता समाधानकारक आहे.

## **वाहतूक वर्दळ**

या शतकामध्ये भारतामध्ये वाहतूक वर्दळीत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आढळून येते. विशेषतः महाराष्ट्राच्या सर्वच रस्त्यांवर वाहतूक वर्दळ प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. हे महाराष्ट्रामध्ये होत असलेल्या आर्थिक तसेच सर्वच क्षेत्रातील विकासाचे द्योतक आहे. या विकासामुळे वाहतुकीमधील सरासरी वाढ दरवर्षी ७ टक्के होत आहे. याचा अस्तित्वातील रस्त्यांवर प्रचंड ताण पडला असून त्यावर मात करण्यासाठी शासनाने विविध प्रकारे पुढाकार घेतला आहे.

**<u>शासनाचा पुढाकार</u>**

राज्यातील रस्त्यांवरील वाढलेल्या वाहतुकीच्या मागणीच्याअनुषंगाने राज्यात **बांधा, वापरा व हस्तांतरित करा** हे तत्त्व यशस्वीपणे राबविले आहे. आजमितीस रस्ते व पुलांची सुमारे १६९ कामे खाजगीकरणाद्वारे हाती घेण्यात आली आहेत. त्यांची किंमत सुमारे २१,१७७ कोटी एवढी आहे, ज्यामध्ये खाजगी उद्योजक आपल्या स्वतःची गुंतवणूक करतात. आजमितीस ९० कामे पूर्ण झाली असून त्यावर पथकर वसुली सुरू झाली आहे व महाराष्ट्रातील जनतेचा झालेल्या विकासाबाबत पथकर देण्यास चांगला प्रतिसाद आहे.

राज्यातील बांधकाम व्यवसाय वाढीस चालना तसेच नेमलेले आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रकल्प सल्लागार ही या प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. सदरील प्रकल्पाचे कंत्राट व सवलतीचा करारनामा हे आंतरराष्ट्रीय फिडीकवर (FIDIC) आधारित आहे. या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रिया पारदर्शक आहेत.

**<u>राज्यमार्गाचे चौपदरीकरण</u>**

महाराष्ट्रातील ६ प्रादेशिक विभागांच्या संपूर्ण सामाजिक व आर्थिक विकासासाठी राज्यमार्गाची सुधारणाही परिणामकारक ठरली आहे. या चौपदरीकरणाच्या प्रकल्पाच्या झालेल्या गुंतवणुकीमुळे स्थानिक स्तरावर तात्पुरत्या आणि कायमस्वरूपी रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. चौपदरीकरणाच्या प्रकल्पामुळे औद्योगिक विकास व रस्त्याच्या लगतच्या जमिनीच्या किमतीत झालेली वाढ ही लक्षणीय आहे. आजमितीस सुमारे रू. २२५५ कोटीची व १२१४ कि.मी. लांबीची कामे मंजूर करण्यात आली असून येत्या २-३ वर्षात ती पूर्ण होणार आहेत.



पुणे-शिरूर राज्यमार्गाचे चौपदरीकरण

राज्यातील प्रमुख शहरे उदा. पुणे, नागपूर, औरंगाबाद, जालना, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बुलढाणा जिल्हा मुख्यालये चौपदरी रस्त्याने नजिकच्या काळात जोडली जातील. शासनाने राज्यमार्गाच्या खाजगीकरणाच्या कामास शासनाचा ४० टक्के आर्थिक सहभाग देण्याचे धोरण स्वीकारले आहे. या धोरणामुळे राज्यमार्गाचे जाळे विकसित होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र राज्याच्या उपरोक्त धोरणास केंद्र शासनाने प्रतिसाद देऊन सुमारे ५ प्रकल्पांवर रू. ४९१ कोटी आर्थिक सहाय्य देण्याचे मान्य केले आहे.



पुणे-नाशिक महामार्गाचे चौपदरीकरण

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची स्थापना

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची स्थापना सन १९९६ मध्ये भारतीय कंपनी कायद्यांतर्गत करण्यात आली. देशातील महत्त्वाचा व पहिला मुंबई-पुणे द्रुतगतीमार्ग या महामंडळाने यशस्वीरित्या पूर्ण केला. सुमारे ९५ कि.मी. लांबीचा नियंत्रित रहदारीचा व कॉंक्रीट पृष्ठभागाचा रस्ता पूर्ण केल्यामुळे पुणे आणि मुंबई ही शहरे जोडली गेली आहेत. त्यामुळे वाहतुकीच्या वेळेत आमुलाग्र बचत झाली आहे. हा द्रुतगतीमार्ग सह्याद्रीच्या बोरघाटातून जातो. या रस्त्यावर ६ बोगदे असून संपूर्ण महामार्गावर प्रवाशांसाठी सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, दूरध्वनी सुविधा, हॉटेल तसेच पेट्रोलपंप इ. सुविधा सुद्धा उपलब्ध आहेत. महामंडळाने मुंबईत ५० उड्डाणपुलांचे काम पूर्ण केल्यामुळे वाहतूक सुलभ होण्यास मदत झाली आहे. सध्या महामंडळाने पूर्व व पश्चिम किनारा जोडणाऱ्या पश्चिम सागरी मुक्तमार्ग तसेच मुंबई-न्हावा-शेवा-शिवडी पारबंदर जोडणी प्रकल्पही नजिकच्या काळात हाती घेतला जात असून सुमारे ४० कि.मी. समुद्रवरील मार्ग उपलब्ध होतो आहे. मुंबई पारबंदर या सागरी पुलाच्या प्रकल्पाची निविदा प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यातील वरळी-बांद्रा हा सागरी पूल फेब्रुवारी, २००८ अखेर पूर्ण होईल. महामंडळाने शहरातील वाहतूक सुलभ होण्याच्यादृष्टीने रस्ता रूंदीकरण संगम स्थळांचे सौदर्यीकरण या प्रकारे एकात्मिक शहर विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. सदरच्या प्रकल्पांतर्गत नगर-बारामती-पुणे येथील काही कामे पूर्ण होऊन काही कामे प्रगतीपथावर आहेत. या प्रकल्पांतर्गत आकारण्यात येणारा पथकर देण्याबाबत स्थानिक जनतेचा उत्तम प्रतिसाद आहे. जवाहरलाल नेहरू अर्बन रिन्युअल मिशनद्वारे महाराष्ट्र राज्यात नजिकच्या काळात प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत.

## राष्ट्रीय महामार्गाची सद्यःस्थिती

महाराष्ट्र राज्यामध्ये राष्ट्रीय महामार्गाची एकूण लांबी ४३६७ कि.मी. असून, त्यापैकी ४५१ कि.मी. लांबीचे चौपदरीकरण करण्यात आले आहे. केंद्रीय भूतल परिवहन, भारत

सरकार, नवी दिल्ली यांनी महाराष्ट्रातील खालील अस्तित्वातील चारपदरी राष्ट्रीय महामार्गांचे सहापदरीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) मुंबई-अहमदाबाद राज्य सीमा हद्दीपर्यंत- रा.म. ८

२) पुणे (पश्चिम बाह्यवळण रस्त्यासह)-सातारा-कोल्हापूर-कागल रा.म.४

३) मुंबई-नाशिक (रा.म.३) भिवंडी बाह्यवळण रस्त्यासह

नजिकच्या काळात मुंबई-नाशिक पुणे सुवर्ण त्रिकोणातील ही शहरे राष्ट्रीय महामार्गाच्या चार ते आठपदरीकरणाने जोडली जाणार आहेत.

तसेच खालील राष्ट्रीय महामार्गाचे नजिकच्या काळात चौपदरीकरण करण्यात येणार आहे.

१) धुळे-अमरावती-नागपूर रा. म.६

२) नागपूर-हैद्राबाद रा.म.७

३) पुणे-सोलापूर रा.म.९

४) मुंबई-इंदापूर-गोवा रा.म.१७

**सारांश**

महाराष्ट्र सरकारच्या पुढाकाराने वर नमूद केलेल्या रस्ते विकासाच्या विविध प्रकल्पामुळे परदेशी गुंतवणूकदार महाराष्ट्रामध्ये गुंतवणूक करण्यास प्रथम पसंती दर्शवितात. महाराष्ट्रातील रस्ते विकासामुळे औद्योगिक क्षेत्रच नव्हे तर प्रमुख शैक्षणिक संस्थांची केंद्रे महाराष्ट्रामध्ये स्थापन झाली आहेत. वैद्यकीय पर्यटन, शेती पर्यटन आणि सांस्कृतिक पर्यटन या क्षेत्रात देखील महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे.

--- ००० ---